# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
## २८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ,
## पुणे-४११००१

दुरध्वनी- 020-26362772
फॅक्स 020-2636 0026

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

E-mail: trti.mah@nic.in
Website: trti.maharashtra.gov.in


---

जावक क्र. आसंप्रसं/२०२२ / स्पर्धा परीक्षा/ प्र.क्र. /का- ४/ १२६८ दिनांक: ०२/०४/२०२२

## महत्त्वाची सूचना (Important Notice)

**विषय: स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमासाठी पुरविण्यात येणाऱ्या अँड्रॉइड टॅबलेट बाबत ........**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे द्वारा अनुसूचित जमातीतील युवक व युवतींसाठी सेवापूर्व प्रशिक्षण धोरणांतर्गत अँड्रॉइड टॅबलेट द्वारा ऑनलाईन खाली नमूद स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने इमेल तसेच गुगल फॉर्म वर स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण घेण्यासाठी विहित मुदतीत अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त अर्जामधून उमेदवारांची निवड हि दहावी, बारावी, पदवी, या परीक्षेमध्ये त्यांना प्राप्त गुणांस (Weightage) भारांक नुसार गुण देऊन गुणानुक्रमे निवड व प्रतीक्षा यादी तयार करून जाहीर करण्यात आली.

सदर निवड यादी मधील उमेदवारांना गुगल फॉर्म मध्ये नमूद केलेल्या त्यांच्या दूरध्वनीवर संपर्क करण्यात आले व त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करून पात्र प्रशिक्षणार्थींना अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नाशिक, ठाणे, नंदुरबार, अमरावती, नागपूर येथे अँड्रॉइड टॅबलेटचे वितरण करण्यात आले. निवड यादीतील अद्याप अँड्रॉइड टॅबलेट स्वीकार न केलेल्या व संपर्क न होऊ शकलेल्या प्रशिक्षणार्थींना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या दूरध्वनी क्रमांकावर वारंवार संपर्क केला आहे तसेच त्यांनी अर्जामधील नमूद केलेल्या ईमेल आय डी वर हि त्यांच्याशी संपर्क होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

या अनुषंगाने निवड यादीतील अद्याप अँड्रॉइड टॅबलेट स्वीकार न केलेल्या उर्वरित सर्व प्रशिक्षणार्थींना या महत्वाच्या सुचनेद्वारे असे कळविण्यात येते कि, दिनांक ०६.०४.२०२२ ( बुधवार) तारखे पर्यंत खाली नमूद केलेल्या संस्थेच्या दूरध्वनी क्रमांकावरच संपर्क साधावा. जर सबंधित उमेदवाराने संबंधित संस्थेला विहित कालावधीतीत संपर्क न केल्यास आपण सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी म्हणून इच्छुक नाही असे समजण्यात येऊन जाहीर केलेल्या प्रतीक्षा यादी मधील पुढील गुणवत्ता धारक प्रशिक्षणार्थीस सदर योजनेचा लाभ देण्यात येईल कृपया याची नोंद घ्यावी.

| **प्रशिक्षण कार्यक्रमाचे नाव** | **प्रशिक्षण देण्याऱ्या संस्थेचे नाव** | **संपर्क** |
|---|---|---|
| संघ / महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा तयारी योजना | यशवंत मानव विकास प्रशिक्षण संस्था , अमरावती | प्रा. उज्ज्वल थोरात सर 9309928134 |
| राष्ट्रीय कृत बँक / रेल्वे / कर्मचारी निवड आयोग इ संस्थामार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षा तयारी प्रशिक्षण (१ ली तुकडी ) | स्पेक्ट्रम अकॅडमी, नाशिक | प्रा. सुनील पाटील सर 9822196217 |
| राष्ट्रीय कृत बँक / रेल्वे / कर्मचारी निवड आयोग इ संस्थामार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षा तयारी प्रशिक्षण (२ री तुकडी ) | स्पेक्ट्रम अकॅडमी, नाशिक (ATC Thane and Nashik) | |
| महाराष्ट्र शिक्षक पात्रता स्पर्धा परीक्षा तयारी योजना | स्पेक्ट्रम अकॅडमी, नाशिक | प्रा. राकेश पवार सर 9503161394 |
| मेडिकल ( NEET) व अभियांत्रिकी (JEE) प्रवेश स्पर्धा परीक्षा तयारी योजना | प्रबोधन बहुउदेशिय संस्था , नाशिक | प्रा. संतोष जेजुरीकर सर 7722017220 |

| प्रशिक्षण कार्यक्रमाचे नाव | प्रशिक्षण देण्याऱ्या संस्थेचे नाव | संपर्क |
|---|---|---|
| महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व, मुख्य व मुलाखत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना | सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, सिम्बायोसिस इंटर नॅशनल (डिमड युनिवर्सिटी ) पुणे | प्रा.सागर कोळेकर सर 7741805435 |
| महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग (JMFC) स्पर्धा परीक्षा पूर्व, मुख्य व मुलाखत प्रशिक्षण योजना | डॉ. डि. वाय. पाटील इन्फ्रा फौंडेशन, अजिंक्य डि. वाय. पाटील युनिवर्सिटी, पुणे | प्रा. कश्मिरा लोणकर 9130028028 |
| UGC-NET/SET स्पर्धा परीक्षा तयारी प्रशिक्षण योजना | सि.आर.जी. अकॅडमी फॉर सस्केस प्रायवेट लिमिटेड, पुणे | प्रा. चंदन सिंग सर 8087674589 |
| बँक पि.ओ. एस एस. सी. एल आय. सी. रेल्वे , सरळ सेवा वर्ग स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना (दुसरी बॅच) | ज्ञानदीप अकॅडमी फॉर यु.पी एस सी ॲण्ड एम पी एस सी , पुणे (ATC Amravati and Nagpur) | प्रा. शाम सर 8888136599 |
| महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना (दुसरी बॅच) | ज्ञानदीप अकॅडमी फॉर यु.पी एस सी ॲण्ड एम पी एस सी , पुणे | |

वर नमूद संस्थेशी संपर्क झाल्यावर सूचित केल्याप्रमाणे निर्धारित वेळेत व त्याच दिवशी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे-४११००१ या कार्यालयात अँड्रॉइड टॅबलेट स्विकारण्यासाठी यावे. सोबत येतांना गुगल फॉर्म वर जो अर्ज सादर केला होता त्या अर्जासहित सर्व कागदपत्राच्या छायांकित प्रतीसह तसेच सर्व मूळ कागदपत्रे आणावीत. प्रशिक्षण कार्यक्रम तसेच अँड्रॉइड टॅबलेट विषयक सर्व बाबी करिता वर नमूद संस्थेशीच संपर्क साधावा.

**टिप: सदर अँड्रॉइड टॅबलेट द्वारा ऑनलाईन स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजनांसाठी कोणत्याही एका प्रशिक्षणाचा लाभ उमेदवार घेऊ शकतो त्यामुळे ज्या उमेदवारांची निवड इतर ऑनलाईन टॅबद्वारा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजनांसाठी झाली आहे अशा उमेदवारांनी इतर कोणत्याही दुसऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठीचा टॅब घेऊ नयेत.**

(शामकांत दौंडकर)
अधिव्याख्याता